


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०६.०६.२०२५ | अंक नं. ५७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







## स्टेशन रोडवरील पुलावर दोघांना मारहाण करुन लुटले

**पोलिसांनी पहाटे सर्च ऑपरेशन राबवत काही वेळात आरोपींना मुद्देमालासह पकडले**

नगर – बसस्थानक येथून रेल्वेस्टेशनकडे पायी जाणाऱ्या दोघांना मोटारसायकल आडवी घालून मारहाण करुन दोघांनी त्यांच्याकडील चांदीची चेन, ७०० रुपये व एक पॅन कार्ड असा ऐवज बळजबरीने चोरुन नेल्याची घटना लोखंडी पुलावर ६ जून रोजी पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास घडली. याची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांच्या पथकाने सर्च ऑपरेशन राबवत काही वेळातच दोघा आरोपींना मुद्देमालासह पकडले आहे.

याबाबत मेहंदी फत्तेदीन हसन (वय ३८, रा. येडेश्वरी साखर कारखाना, ता. केज, जि. बीड मूळ रा. पूरबालीया, मुजफ्फरनगर, उत्तर प्रदेश) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचा मित्र तोहिद चौधरी हे बकरी ईद सणानिमित्त रेल्वेने त्यांच्या गावी जाण्याकरीता एसटी बसने केज (बीड) येथून अहिल्यानगर येथील पुणे बसस्थानक येथे उतरले. तेथून रेल्वेस्टेशनकडे पायी जात असताना लोखंडी पुलावर २ अनोळखी इसम त्यांच्यासमोर मोटारसायकलवर आले व मोटारसायकल आडवी लावून त्यांना तुमच्याकडील मोबाईल व पैसे आम्हाला द्या नाहीतर तुम्हाला मार खावा लागेल असे म्हणाले. त्यावर फिर्यादी व त्यांच्या मित्राने पैसे देण्यास नकार दिला असता दोघांनी फिर्यादी व त्यांच्या मित्राला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यातील एका इसमाने फिर्यादीच्या गळ्यातील चांदीची चेन, ५०० रुपये व पॅनकार्ड काढून घेतले. तसेच दुसऱ्या अनोळखी इसमाने तोहीद चौधरी याच्या खिशातील २०० रुपये बळजबरीने काढून घेतले. त्यावेळी पहिल्या इसमाने दुसऱ्यास यश चल आपल्याला पैसे भेटले आहे असे म्हणुन ते दोघे मोटारसायकल (क्र.एम एच १६ डी एच ८३०४) वर बसून निघून गेले. तोहीद चौधरी याने त्याच्या मोबाईलवरुन पोलिस नियंत्रण कक्षास १०० नंबरला मदतीकरिता फोन केला.

काही वेळाने तेथे एक पोलीस गाडी आली व त्यांच्यासोबत मोटारसायकलवर दोन पोलीस आले. फिर्यादी यांनी पोलीस गाडीला मदतीसाठी थांबवले व गाडीतील पोलीस अधिकारी यांना त्यांची हकीकत सांगितली. त्यानंतर पोलिसांनी लगेच आरोपींचा शोध सुरु करून यश सुरेश सोनवणे (रा. अचानक चाळ, गौतमनगर, स्टेशनरोड, अ. नगर) आणि सुमित रामेश्वर गिरी (रा. संजयनगर, काटवन खंडोबा, अ. नगर) यांना पकडले. त्यांच्याकडून एक चांदीची चेन, ७०० रुपये व एक पॅनकार्ड असा चोरलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी मेहंदी हसन यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी दोघांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक प्रवीण पाटील हे करीत आहे.

## पुणे बसस्थानकातून महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण पळविले

नगर – एसटी बसमध्ये बसण्याकरिता आत प्रवेश करीत करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील १ तोळा ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनीगंठण कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन चोरुन नेले. ही घटना स्वस्तिक चौक येथील पुणे बसस्थानक येथे ५ जून रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत राजश्री शिवाजी भोंडवे (वय ५६, रा. बिल्डिंग नंबर ४ आयकॉन कॉलनी, जामखेड) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या चुलत बहिणीच्या पतीचे निधन झाल्याने त्या त्यांच्या नणंदेसह जामखेड येथून नगर येथे नातेवाईकांकडे भेटायला आल्या होत्या. ५ जून रोजी सायंकाळी नगरहून जामखेड येथे जाण्याकरिता फिर्यादी व त्यांची नणंद सुमित्रा गाडेकर या दोघी स्वस्तिक चौक येथील पुणे बसस्थानक येथे थांबल्या होत्या. यावेळी बस स्थानक परिसरात ये जा करणाऱ्या प्रवाशांची खूप गर्दी होती. बस स्थानकात जामखेड येथे जाण्याकरिता एसटी बस लागल्याने लोकांच्या गर्दीतून फिर्यादी या बसमध्ये बसण्यासाठी आत प्रवेश करीत असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांच्या गळ्यातील १ तोळा ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन पदरी मिनीगंठण चोरुन नेले. एसटी बस मध्ये बसल्यानंतर गळ्यात गंठण नसल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले. त्यांनी बसमध्ये गंठणचा शोध घेतला असता ते मिळून आले नाही. त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## अर्बन बँक रोडवरील चहाची हातगाडी आगीत भस्मसात

नगर – शहरातील नगर अर्बन बँक रोडवरील काटे गल्लीत असलेली चहाची हातगाडी ६ जून रोजी पहाटे अचानक लागलेल्या आगीत जळून भस्मसात झाली. या घटनेत चहा बनवण्याच्या साहित्यासह रोख रक्कम असे सुमारे २० हजार रुपयाचे नुकसान झाले आहे. ही आग कोणी लावली का, अचानक लागली याचे कारण कळू शकलेले नाही.


शहरातील अर्बन बँक रोडवरील आगीत भस्मसात झालेली चहाची हातगाडी.

याबाबत गणेश दामोदर शिरोलीकर (वय ५९, रा. प्रेमदान हडको, दत्त मंदिरासमोर, सावेडी, अ. नगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. शिरोलीकर यांची अर्बन बँक रोडवरील काटेगल्ली येथे चहाची गाडी आहे. फिर्यादी यांचा भाऊ कृष्णा हा आजारी असल्याने फिर्यादी यांची चहाची गाडी ३१ मे पासून बंद आहे. ६ जून रोजी फिर्यादी यांचे ओळखीचे हर्षद शहा यांचा पहाटे ३ वाजून १८ मिनिटांनी फोन आला व ते म्हणाले की तुमची चहाची गाडी जळत आहे. तुम्ही लवकर या. अशी माहिती मिळताच शिरोलीकर यांनी लगेच अग्निशामन दलाची गाडी बोलावली. अग्निशामक दलाच्या गाडीने हातगाडीस लागलेली आग विझवली.

या आगीमध्ये फिर्यादी यांचे चहा करण्याचे दोन पातेले, पाण्याचा साठा करण्याचा एक ड्रम, एक स्टीलची बादली, तीन प्लास्टिक बकेट, दोन लोखंडी बाकडे, गॅसची शेगडी, महाराष्ट्र बँकेचे एटीएम कार्ड, पॅन कार्ड, मर्चंट बँकेचे पासबुक व चेक बुक, दूधवाल्यासाठी ठेवलेले ५ हजार रुपये रोख रक्कम, उधारीच्या डायऱ्या असे साहित्य जळून सुमारे २० हजार रुपयाचे नुकसान झाले. ही आग कशामुळे लागली याबाबत माहिती समजू शकली नाही. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गणेश शिरोलीकर यांनी दिलेल्या माहितीवरुन जळीताची नोंद करण्यात आली.












जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# भन्ते विनयाचार्य यांना झालेली अटक व बिहारच्या राज्यपालांनी धार्मिक भावना दुखावल्याचा निषेध

**महाबौध्दि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात द्या; महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन संघर्ष समितीचे जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने**

नगर – बिहार मधील बिहार मधील महाबौध्दि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करण्यात आली. तसेच महाबौध्दि बुद्धविहारच्या मुक्तीसाठी सुरु असलेले आंदोलन दडपण्यासाठी सुरु असलेले कटकारस्थान, भन्ते विनयाचार्य यांना झालेली अटक व बिहारचे राज्यपाल यांच्या माध्यमातून बौध्द समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्याचा निषेध करण्यात आला.

टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक मधील भगवान गौतम बुद्ध व माळीवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाने जावून निदर्शने करण्यात आली. बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करण्यासाठी समाजबांधवांनी घोषणाबाजी केली. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सदर मागण्यांचे निवेदन राष्ट्रपती यांना पाठविण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांनी शिष्टमंडळाचे निवेदन स्विकारले.



बिहार मधील बिहार मधील महाबौध्दि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून निवासी उपजिल्हाधिकारी प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांना निवेदन देण्यात आले.

संपूर्ण देशभरात १२ फेब्रुवारी पासून महाबौध्दि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरु आहे. बिहार सरकार व केंद्र सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे. जाणीवपूर्वक आरएसएस व भाजपने बिहार येथील राज्यपाल यांना महाबौध्दि बुद्धविहारात पाठवून शिवलिंगची पूजा करवून घेतली. यापूर्वी देखील त्यांनी महाबोधी महाविहारला शिवालय संबोधित करून देशातील बौध्द समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या. बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान मुस्लिम असून वैदिक मंत्र उच्चारात त्यांच्याकडून पूजा करविण्यात आली आहे. राज्यपालांनी आंतरराष्ट्रीय धरोवर असलेल्या महाबोधी महाविहारचा अपमान केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

बीटीएमसी बौद्ध धरोवर नष्ट करण्यासाठी बनवण्यात आले आहे. बीटी ॲक्ट रद्द करण्याची मागणी यावेळी समाजबांधवांनी केली. बिहार तथा केंद्र सरकार भारतातील बौद्ध समाजाला उकसवण्याचे काम करत आहे. १३ मे रोजी बिहार येथे महाबौध्दि बुद्धविहारच्या मुक्तीसाठी शांततेने सुरु असलेल्या आंदोलनात काही जातीयवादी गुंडांनी धुडगुस घातला. बिहार पोलिसांनी ही परिस्थिती आटोक्यात आणण्याऐवजी भन्ते विनयाचार्य यांच्यासह त्यांच्या साथीदारांना अटक केली. यामुळे सर्व समाज बांधवांच्या भावना तीव्र असून, तात्काळ बीटी ॲक्ट रद्द करुन बिहार मधील महाबौध्दि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याची मागणी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन संघर्ष समितीच्यावतीने करण्यात आली आहे.

### १५ जूनला शहरात रॅलीचे आयोजन व २ ऑक्टोबरला नागपूर येथील आरएसएस कार्यालयावर घेराव आंदोलन

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने अहिल्यानगर शहरात १५ जून रोजी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. तर २ ऑक्टोबरला नागपूर येथील आरएसएस कार्यालयावर मोर्चाने जावून घेराव आंदोलन केले जाणार आहे. यामध्ये सर्व समाजबांधवांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



### वाढती अर्थव्यवस्था – सामान्यांना उर्जितावस्था!

जागतिक मंदी व युद्धजन्य वातावरणात आपल्या सर्वांच्या दृष्टीने एक चांगली बातमी, कामगिरी आली आहे.

भारताने जागतिक आर्थिक मंचावर एक नवीन, ऐतिहासिक व विक्रमी टप्पा गाठला आहे.

आयएमएफ अर्थात आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या आकडेवारीनुसार भारताने नुकतेच जपानला मागे टाकत जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचा बहुमान पटकावला आहे. ९२ च्या ग्लोबलायझेश स्वीकारल्यापासून अर्थव्यवस्थेने हळूहळू अर्थव्यवस्थेने बाळसं धरणं सुरू केले.

आपला भारत तरुणाईचा देश असून, जपानला वृद्धत्व (सरासरी वय) व मंदीने काहीसे मागे टाकले. अर्थात क्रमांक १, २ चे अमेरिका व चीन आजतरी आपल्या खूप पुढे आहेत. शिवाय शेवटच्या माणसापर्यंत विकासाची फळे चाखायला मिळण्यास अजूनही मोठे काम करीत जीडीपी किमान ८% दरवर्षी वाढवावा लागेल.

आर्थिक विकासाबरोबर सामाजिक, मानसिक सुदृढता तपासावी लागेल. तरुणाईला कार्यमग्न ठेवून सर्वांगिण विकासाचा प्रयत्न करावा लागेल.

सुदैवाने गेल्या २/३ दशकात भांडवली गुंतवणूक, पायाभूत सेवासुविधा, दळणवळण यात भरीव प्रगती होत आहे. संरक्षण क्षेत्रात लक्षणीय निर्यात वाढवून परकीय चनाची गंगाजळी वाढवता येणार आहे. आत्मनिर्भर भारत बनवण्यात तरुणांना रोजगार मिळेल व विकासही होत राहील.

राजकीय स्थैर्यता, धोरणात्मक सातत्याने निकाल चांगले येतात. महागाई नियंत्रण व दरडोई उत्पन्नात भरीव वाढ झाल्यास २/३ वर्षातच आपण तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनू याचा विश्वास वाटतो.

– किशोर गांधी

## श्रीराम मंदिरांची दानपेटी फोडणारा आरोपी १२ तासाच्या आत जेरबंद

**नगर तालुका पोलिसांची कारवाई**



नगर तालुक्यातील दहिगाव येथील श्रीराम मंदिरांची दानपेटी फोडणारा आरोपी पकडल्यानंतर त्याच्या समवेत स.पो.नि. प्रल्हाद गिते व पोलिस पथक.

नगर – नगर तालुक्यातील दहिगाव येथील श्रीराम मंदिरांची दानपेटी फोडणारा आरोपी तालुका पोलिसाच्या पथकाने १२ तासाच्या आत जेरबंद केला आहे. गणेश सोन्याबापू हंबर्डे (वय २५, रा. दहिगाव ता. नगर) असे या आरोपीचे नाव आहे.

दहीगाव येथे प्रसिद्ध श्रीराम मंदिर असून या मंदिरात परिसरातील भाविक दर्शनासाठी येत असतात. मंदीर ट्रस्टच्या वतीने मंदिरात दानपेटी ठेवलेली असून त्यात भाविक इच्छेनुसार रोख रक्कम दान म्हणून टाकत असतात. या जमा झालेल्या रकमेतून मंदिराच्या परिसरात विविध कामे केली जातात. मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष नागेश तुळशिराम वाघ हे ४ जून रोजी सायंकाळी ७ वाजता दर्शनासाठी गेले तेव्हा दानपेटी व्यवस्थित होती. त्यानंतर ते पुन्हा ५ जून रोजी सकाळी ८ वाजता नेहमीप्रमाणे देवदर्शन करण्यासाठी गेले असता त्यांना मंदीराचे सभामंडपात ठेवलेल्या दान पेटीचे कुलुप तुटलेले दिसले. त्यानंतर गावातील इतर लोकही तेथे आले. त्यांनी दानपेटी उघडून पाहिली असता त्यातील अंदाजे ६ ते ७ हजारांची रोकड चोरीला गेलेली दिसली.

याबाबत नागेश वाघ यांनी नगर तालुका पोलिसांना माहिती देत फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी जाऊन बारकाईने पाहणी केली. त्यानंतर सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ तपास सुरु केला. तांत्रिक तपास करून काही वेळातच सदर चोरी गावातीलच गणेश सोन्याबापू हंबर्डे याने केल्याचे तपासात निष्पन्न करून १२ तासाच्या आत आरोपीला अटक करण्यात आली.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली नगर तालुका पोलीस स्टेशनचे स. पो.नि.प्रल्हाद गीते पोलीस उपनिरीक्षक भरत धुमाळ, सहाय्यक फौजदार रमेश गांगर्डे, पो. हे.कॉ. शरद वांढेकर, गणेश लबडे, नगर दक्षिण मोबाईल सेल विभागाचे पो. कॉ.नितीन शिंदे आदींच्या पथकाने केली.

### सिव्हील हॉस्पिटलमधून मोटारसायकलची चोरी

नगर – जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या पार्किंगमध्ये लावलेली हिरो कंपनीची एच.एफ.डिलक्स मोटारसायकल (क्र.एम. एच.१६ सी. के.१०१६) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना ४ जून रोजी सकाळी घडली. याबाबत राजु भास्कर साळवे (वय ४५, रा. दुधसागर सोसायटी, केडगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपी गावठी कट्ट्यासह पकडला

नगर – खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यातील फरार असलेल्या आरोपीस तोफखाना पोलिसांनी वेषांतर करून सापळा रचून शिताफीने पकडले. त्याच्याकडून देशी बनावटीचा गावठी कट्टा जप्त केला आहे. ही कारवाई मिरवली दर्गा परिसरात ४ जून रोजी करण्यात आली.

या बाबतची माहिती अशी की २ जून रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या खुनाचा प्रयत्नाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी अकिब दाऊद शेख (रा. कवीजंगनगर) हा गुन्हा दाखल झालेपासुन पसार होता. व पोलीसांना वेळोवेळी हुलकावणी देत होता, त्याचा शोध घेण्यासाठी पो. नि. कोकरे यांनी गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली एक स्वतंत्र पथक तयार केले.

पोलिसांना माहिती मिळाली की, आरोपी अकिब शेख हा मिरावली दर्गा परिसरात येणार आहे. अशी माहीती मिळाल्याने पो.नि.कोकरे यांनी गुन्हे शोध पथकास तोंडी सुचना देवुन आरोपीचा शोध घेण्याकरिता रवाना केले. गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मिरावली दर्गा परिसरात वेष बदलुन सापळा लावुन अकिब शेख याचा शोध घेतला. तो पोलिसांना पाहून पळण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी बनावटीचे लोखंडी पिस्तुल मिळून आल्याने ते जप्त करण्यात आले आहे. अकिब शेख यास ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, (नगर शहर विभाग) यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या गुन्हे शोध पथकातील पोलीस पथकातील पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

## शहर परिसरात दुचाक्या चोरणारा सराईत चोर पकडला

**चोरीच्या चार मोटारसायकली केल्या जप्त**

नगर – नगर शहर परिसरात मोटारसायकल चोरी करणाऱ्या सराईत चोरट्यास तोफखाना पोलिसांनी पकडले असून त्याच्याकडून २ लाख रुपये किमतीच्या चार मोटार सायकल जप्त केल्या आहेत. ही कारवाई ५ जून रोजी करण्यात आली.



शहर परिसरात दुचाक्या चोरणाऱ्या सराईत चोरट्याला पकडल्यानंतर त्याच्यासमवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत मोटारसायकल चोरीचे प्रमाण वाढत असल्याने पो. नि. आनंद कोकरे यांनी रेकॉर्डवरील आरोपी तपासून त्याच्याकडे सखोल तपास करुन मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश गुन्हे शोध पथकाला दिले होते. त्यानुसार ५ जून रोजी गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील व पोलीस अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत एकविरा चौक रोड याठिकाणी पेट्रोलिंग करत असताना किशोर जयसिंग पठारे, (वय ४५, रा. पिंपळगांव माळवी, ता. नगर) हा एका मोपेडवर जाताना दिसला. त्यास थांवण्याचा इशारा केला असता तो पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्यास भिस्तवाग चौक येथे पकडण्यात आले. त्याच्याकडे असलेल्या मोपेडबाबत विचारपुस केली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने ती मोपेड चोरीची असल्याचे सांगितले. त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने केलेल्या चोरीची कबुली दिल्याने तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल असलेले चार गुन्हे उघकीस आले आहे. पोलिसांनी त्याच्याकडून सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेड (क्र. एम. एच.१६, डि.के १९५९ ), शाईन मोटार सायकल (क्र. एम. एच. १६. सी.एस.५८२३), बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटारसायकल (क्र. एम. एच. १६, बी. डी.२४४२), हिरो कंपनीची एच.एफ डिलक्स मोटार सायकल (क्र. एम.एच.१६. वी.आर.५१८८) अशा १ लाख ९९ हजार ५०० रुपये किमतीच्या चार मोटार सायकल जप्त केल्या.

## मध्यरात्री संशयितरित्या फिरणाऱ्यास पकडले

नगर – मध्यरात्री काहीतरी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने अंधारात संशयितरित्या वावरणाऱ्या तरुणास कोतवाली पोलिसांनी पकडले. ही कारवाई स्टेशनरोड वरील पाटील हॉस्पिटल जवळ, कोठी येथे ५ जून रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास केली.

याबाबतची माहिती अशी की, कोतवाली पोलीस रात्री गस्त करीत असताना पहाटे २.३० वाजता पाटील हॉस्पीटलजवळ, कोठी येथे एक इसम आपले अस्तित्व लपवुन अंधारामध्ये भिंतीचे आडोशाला संशयित रित्या उभा असलेला दिसला. त्यावेळी पोलिसांनी त्यास नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव संजु सोनु सिंग (वय २८, मुळ रा. मैनागुडी, पश्चिम बंगाल, हल्ली. रा. वेलकम लॉज, माळीवाडा, अ.नगर) असे असल्याचे सांगितले. तेव्हा त्यास इथे काय करत होता याबाबत विचारपुस केली असता त्याने समाधानकारक उत्तर न देता उडवाउडवीची उत्तरे दिल्यामुळे पोलिसांनी त्यास कोतवाली पोलीस ठाण्यात घेवुन आणले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात संजू सिंग याचेविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ज्ञानेश्वर धाडगे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – भिंगार येथील ज्ञानेश्वर सिताराम धाडगे (वय ५५) यांचे ३ जून रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार येथील शुक्लेश्वर मंदिर अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ भाऊ, भावजया, पुतणे असा परिवार आहे. हभप अरुण महाराज, महादू व विजय धाडगे यांचे ते बंधू होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अपघाताचा बनाव करून खून करणाऱ्या आणखी २ आरोपींना पोलिसांनी पकडले

**न्यायालयाने सुनावली दोन दिवसांची पोलीस कोठडी, इतर आरोपींचा पोलिसांकडून कसून तपास सुरु**

नगर – प्रेमप्रकरणातून तरूणाचा खून करून तो अपघात असल्याचा बनाव केल्याची धक्कादायक घटना नगर तालुका पोलीस स्टेशनचे स.पो.नि.प्रल्हाद गीते यांनी तपासातून उघडकीस आणली आहे. या प्रकरणात विश्वजीत सुभाष पोटे व संकेत बाळासाहेब बंडाले (दोघे रा.दादेगाव, ता. आष्टी) यांना ४ जून रोजी पकडल्यानंतर ५ जून रोजी अमरसिंह सुभाष पोटे व धनंजय सुभाष फुंदे (दोघे रा. दादेगाव) या दोघांना अटक केली आहे. त्यांना न्यायालयाने २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यात आणखी आरोपींचा सहभाग असून त्यांचा कसून शोध पोलिस घेत आहेत.



प्रेमप्रकरणातून तरूणाचा खून करून तो अपघात असल्याचा बनाव करणारे ४ आरोपी पकडल्यानंतर त्यांच्या समवेत नगर तालुका पोलिसांचे पथक.

ही घटना ३० मे रोजी सायंकाळी टाकळी काझी (ता.नगर) शिवारातील हॉटेल रायबा समोर घडली होती. आदेश नंदू घोरपडे (वय २२, रा. कायनेटिक चौक, अहिल्यानगर) हा तरूण आणि त्याचा मित्र मोहित संतोष निमसे (वय २०, रा. रंगोली चौक, केडगाव) दुचाकीवरून नगरच्या दिशेने येत असताना आरोपी त्यांचा बुलेट वरून पाठलाग करीत होते. तेव्हा त्यांनी व इतर आरोपीनी अमर सुभाष पोटे यास फोन करून तू नगरच्या दिशेने कुठपर्यंत आला. मयत हा कुठपर्यंत आलाय आम्ही त्याच्या मागे आहोत, बाबत माहिती देऊन पिकअप वरील अमर पोटे यास मयतास उडविण्यास सांगितल्याने त्याने टाकळी काजी गावच्या शिवारातील हॉटेल रायबाचे समोर मयतास व त्याचे मित्रास उडविले. त्यामुळे घोरपडे याचा मृत्यू झाला होता. व मोहित निमसे जखमी झाला.

मोहित निमसे याने या प्रकरणी २ जून रोजी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार अज्ञात पिकअप चालकाविरूध्द अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, मृत घोरपडेच्या आईने हा अपघात नसून तिच्या मुलाचा खून झाल्याचा संशय पोलिसांकडे व्यक्त केला होता. त्यामुळे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांनी तपासाची दिशा बदलून अधिक सखोल चौकशी केली असता, ही हत्या असल्याचे निष्पन्न झाले. यासंदर्भात स.पो. नि. गिते यांनी सांगितले की, आदेश घोरपडे याचे बीड जिल्ह्यातील दादेगाव (ता. आष्टी) येथील एका मुलीसोबत प्रेमसंबंध होते. मात्र तिच्या कुटुंबीयांनी तिचे लग्न दुसऱ्या मुलासोबत ठरवले होते. याची माहिती घोरपडे याला मिळाल्यानंतर त्याने मोहित निमसे व इतर चार मित्रांसह ३० मे रोजी दादेगाव गाठले. तेथे मुलीच्या नातेवाईकांशी त्याचा वाद झाला. या वादानंतर घोरपडे व निमसे दुचाकीवरून पळून आले, तर त्यांचे इतर मित्र चारचाकीने परतले. यानंतर मुलीच्या नातेवाईकांनी पाठलाग सुरू केला. दरम्यान, घोरपडे व निमसे हे टाकळी काझी शिवारातून जात असताना पिकअप वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत घोरपडे जागीच ठार झाला. हा अपघात नसून पूर्वनियोजित कट असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सदरची कारवाई स.पो. नि. प्रल्हाद गीते, पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे, पोलिस अंमलदार सुभाष थोरात, रवी सोनटक्के, बाबासाहेब खेडकर, संभाजी बोराडे, सागर मिसाळ, विक्रांत भालसिंग, राजू खेडकर तसेच दक्षिण विभाग मोबाईल सेलचे नितीन शिंदे यांच्या पथकाने केली आहे.

# क्रीडा क्षेत्राला चालना देण्याचे काम सरकार करत आहे

## भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन; शेवगावला कुस्ती स्पर्धेत मल्लांची डावपेचांची उधळण, देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धा उत्साहात

नगर – आपले सरकार क्रीडा धोरण पुढे घेऊन जात आहे. गावा–गावात खेलो इंडियाच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्राला चालना देण्याचे काम सरकार करत आहे. सर्व जिल्ह्यातील गावागावातून विविध खेळाचे चॅम्पियन तयार झाले पाहिजे, क्रीडा क्षेत्राला महत्त्व देऊन क्रीडा धोरणाचे नियोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

शेवगाव येथे अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी बावनकुळे बोलत होते.

खंडोबा मैदानावर झालेल्या या स्पर्धेसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, प्रताप (काका) ढाकणे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा या स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे, जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, खजिनदार पै. नाना डोंगरे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, नंदू मुंढे, माजी जिल्हा परिषद सदस्य अर्जुन शिरसाठ, फारुक पटेल, सुनील धोत्रे, पप्पू शिरसाठ, बापूराव चव्हाण, युवराज पठारे, विक्रम बारवकर, तुषार वैद्य, अमोल सागडे, डॉ. कृष्णा देहाडराय, एकनाथ कुसळकर, अंकुश कुसळकर, मगर कडू, कमलेश गांधी, दिगंबर काथवटे, माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, विक्रम बारवकर, दिपक डावखर, रमेश दारकुंडे, विनोद मोहिते, सालार शेख, माऊली खेडकर, बाळासाहेब कोळगे, एकनाथ शिरसाठ, गणेश गर्जे, उदय मुंढे, सुनील जगताप, क्रीडा अधिकारी भाऊसाहेब वीर, माजी सैनिक विनोद शेळके, पप्पू केदार, अंकुश ढाकणे, सोमा मोहिते, अभी बडे, अंबू पहिलवान, प्रकाश चित्ते आदींसह संयोजन समितीचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले, राज्यासह देशात लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जन्मशताब्दी सोहळा साजरा होत असताना वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच कॅबिनेटची बैठक चोंडीला घेऊन १० हजार कोटीचे कामे मंजूर करण्यात आली. देशात ५ हजारापेक्षा अधिक कार्यक्रम घेण्यात आले. अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या राज्यात जे कल्याणकारी उपक्रम राबवले, ते जसेच्या तसे महाराष्ट्रात राबविण्याचा सरकारचा संकल्प आहे. राज्यात पुढील पाच वर्षांनी प्रत्येक शेतकऱ्याला पाणी व १२ तास वीज मोफत मिळणार असल्याचे त्यांनी आश्वासन दिले.



शेवगाव येथे अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धा उत्साहात पार पडली.

राम शिंदे यांची कुस्ती थोड्यावरून हुकली, थोडी कुस्ती राहिली होती. त्यांच्या विरोधात जिल्ह्यात काही शक्ती घुसू पाहत आहे, षडयंत्र करून त्यांना कमजोर करण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना सभापती केल्याचा टोला देखील त्यांनी विरोधकांना लगावला.

राधाकृष्ण विखे पाटील यांनी कुस्ती स्पर्धेचे अवघड नियोजन उत्तम प्रकारे करुन शेवगावमध्ये घेण्यात आलेल्या देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाचे कौतुक केले. तर जिल्ह्यासह राज्यातून आलेल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

प्रा. राम शिंदे म्हणाले की, एप्रिल, मे महिन्यात शेवगाव, पाथर्डी भागात जनावरांचा चारा, पाणी व टँकरचा प्रश्न उद्भवतो, मात्र देवाभाऊ कुस्ती स्पर्धेचे आयोजन केल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाऊस होवून ही स्पर्धा पुढे ढकलण्याची वेळ आली. चांगला पाऊस झाल्याने चारा, पाणी व टँकरचा प्रश्न सुटून आनंदाचा क्षण या भागात निर्माण झाला आहे. या कुस्ती स्पर्धेत तीन महाराष्ट्र केसरी व आंतरराष्ट्रीय महिला कुस्तीपटूसह राज्यातून मल्ल सहभागी झाले, ही आनंदाची बाब आहे. अलीकडे मैदानी खेळ कमी झाले आहे. महाराष्ट्राच्या मातीतला हा खेळ खेळला गेला पाहिजे. या खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविकात अरुण मुंढे यांनी गेली पंचवीस वर्षापासून राजकारण व समाजकारणात सक्रीय असून, त्यापूर्वी खेळाडू म्हणून मैदानावर होतो. पुन्हा खेळ जोपासण्यासाठी व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पाहुण्यांच्या हस्ते या स्पर्धेचे खास आकर्षण असलेली महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध महाराष्ट्र केसरी हर्षद सदगीर यांच्यात दीड लाख रुपयांवर, तर महिला विभागात नॅशनल मेडलिस्ट उषा कुमारी विरुद्ध नॅशनल मेडलिस्ट सोनाली मंडलिक यांच्यात एक लाख रुपयांवर निमंत्रित कुस्ती लावण्यात आली. दोन्ही कुस्त्या अत्यंत अटीतटीच्या व रंगदार झाल्या. यामध्ये हर्षद सदगीर आणि सोनाली मंडलिक यांनी प्रतिस्पर्धी मल्लाला चितपट करुन विजय संपादन केले. पाहुण्यांच्या हस्ते त्यांना बक्षीस देण्यात आले. संध्याकाळी उशीरापर्यंत फायनलच्या कुस्त्या सुरु होत्या. पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी कुस्ती पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

# अमृतेश्वर मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

### धर्मादाय उपायुक्तांची उपस्थिती : मिरवणूक, होमहवन, प्रसाद वाटप कार्यक्रम उत्साहात

नगर – येथील अर्बन बँक चौकातील पुरातन अमृतेश्वर महादेव देवस्थान मंदिरात विविध देव–देवतांच्या मूर्तींची बुधवारी प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यानिमित्त महापूजा, होम हवन, मिरवणूक, महाआरती, प्रसाद आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अहिल्यानगरचे धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप यांच्या हस्ते महाआरती झाली.

अमृतेश्वर मंदिर हे पुरातन मंदिर आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांनी हे मंदिर स्थापन केल्याचे उल्लेख इतिहासात आढळतात. १९५२ मध्ये या मंदिर देवस्थान ट्रस्टची स्थापना झाली. या मंदिरात गणपती, मारुती, पार्वती, विठ्ठल–रुख्मिणी, दत्तात्रेयांच्या मूर्तींची वेद मंत्रांच्या जयघोषात स्थापना करण्यात आली. आशुतोष रेखी यांनी या सोहळ्याचे पौराहित्य केले. डॉ. दर्शन करमाळकर, पंकज पांड्या, राजेंद्र जोशी, पेठकर, यशवंत नवले, कुलकर्णी, गोपी कुलकर्णी, योगेश सुपेकर, सचिन पेठकर आदींसह ११ दाम्पत्यांना महापुजेचा मान देण्यात आला होता. सकाळी परिसरातून प्रतिष्ठापना करण्यात येत असलेल्या मूर्तींची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. अहिल्यानगरचे धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी जगताप यांचा देवस्थान विश्वस्त मंडळाने सत्कार केला. यावेळी विश्वस्त नंदिनी जोशी, सतीश सुपेकर, रवींद्र शित्रे, सुनील शिंदे, देवस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड. गौरव मिरीकर आदींची उपस्थिती होती.



अहिल्यानगर शहरातील अमृतेश्वर महादेव देवस्थानच्या अमृतेश्वर मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळ्याप्रसंगी धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप यांची उपस्थिती होती. त्यांचा सत्कार करताना विश्वत मंडळाचे सदस्य सतीश सुपेकर, रवींद्र शित्रे, ॲड. गौरव मिरीकर आदी.

यावेळी धर्मादाय उपायुक्त जगताप म्हणाले, पुरातन वारसा असलेल्या या मंदिरातील प्रसन्न वातावरण मनाला समाधान देते. जो वारसा आहे, त्याचे जतन करण्यासाठी विश्वस्त असलेले ज्येष्ठ मंडळी धडपड करत आहेत, हे कौतुकास्पद आहे. त्यांना समाजाने सहकार्य करण्याची भूमिका ठेवावी.

# प्रत्येकाने एक तरी झाड लावावे

### सुनिल सकट यांचे प्रतिपादन; लालटाकी येथे जागतीक पर्यावरण दिन साजरा

नगर – जागतिक पर्यावरण दिना निमीत्त अहिल्यानगर येथील लालटाकी भागात वृक्षारोपण उपक्रम घेण्यात आला. पर्यावरण ही काळाची गरज आहे. वातावरणात ऑक्सिजन ची नियमीत निर्मीती व्हावी, सजीव सृष्टीस मुबलक प्रमाणात प्राणवायु मिळावा. सर्वत्र हरीतक्रांती व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून विविध ठिकाणी वृक्षारोपणाचे उपक्रम राबवले आहेत. सामाजिक जबाबदारी ओळखून प्रत्येकाने एक तरी झाड लावावे, असे प्रतिपादन भारतीय लहुजी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र प्रमुख सुनिल सकट यांनी केले आहे.



पर्यावरण दिनानिमित्त लालटाकी येथे वृक्षारोपण करण्यात आले.

लालटाकी परिसरात जागतीक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून संतोष शिरसाट व सुनिल सकट यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी विनोद शिरसाठ, अनिल वाघमारे, अंजना शिरसाट, मल्हार कुचेकर, सचिन शिरसाट, दिपक आव्हाड, गौरी शिरसाट, अनिल शेलार, कुणाल शिरसाट, विनायक शिरसाट आदींसह शालेय विद्यार्थी, भगिनी व नागरीक उपस्थित होते. वृक्षारोपणाचा उपक्रम सुनिल सकट यांच्या पुढाकारातुन राबवण्यात आला. सदर वृक्ष संवर्धनाची जबाबदारी संतोष शिरसाट यांनी स्विकारली.





पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या शनाया घुले आणि तनिषा धानड यांना 'ब्लॅक बेल्ट' किताब मिळाला.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या घुले आणि धानड यांना 'ब्लॅक बेल्ट' किताब

नगर – दि इंडियन पॉवर मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्र यांच्यावतीने आयोजित ६६ वे उन्हाळी मार्शल आर्ट निवासी प्रशिक्षण शिबिर २६ ते २९ मे दरम्यान यशस्वीरित्या पार पडले. या शिबिरात अहमदनगर येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या शनाया अविनाश घुले आणि तनिषा सचिन धानड या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय सहभाग घेत सर्वोच्च कामगिरी बजावली. त्यांच्या उत्कृष्ट सरावाच्या जोरावर दोघींनीही मार्शल आर्टमधील प्रतिष्ठेचा ब्लॅक बेल्ट किताब मिळवला.

या शिबिरात पुणे, सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यातील निवडक १५० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये कराटे, तायक्वांडो, किक बॉक्सिंग यांसारख्या मार्शल आर्ट खेळांसोबतच लाठी–काठी, तलवारबाजी, रायफल शूटिंग यांसारख्या साहसी खेळांचे तसेच आइसस्टॉक, योगा व एरोबिक्स यांचेही प्रशिक्षण देण्यात आले.

या यशाबद्दल शनाया घुले व तनिषा धानड यांचा शाळेचे प्राचार्य मंगेश जगताप, उपप्राचार्या शगुफ्ता काजी, शाळेचे सिनियर अडमीन ऑफिसर आशुतोष नामदेव यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या दोनही खेळाडूंना विद्यालयाचे प्रशिक्षक मास्टर महेश आनंदकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# निंबळक विद्यालयातील माजी विद्यार्थी ३७ वर्षानंतर आले एकत्र

### प्रथम मानांकित सन १९८८ बॅचचा आगळा–वेगळा गेट टुगेदर कार्यक्रम

नगर – निंबळक माध्यमिक विद्यालयाच्या स्थापनेनंतरच्या पहिल्या मानांकित इ.१० वी बॅचचा गेट टुगेदर कार्यक्रम उत्साहात झाला. यावेळी त्या वेळेस शिकवणाऱ्या सर्व माजी गुरुवर्यांचा सत्कार, गुणवंत व यशवंत माजी विद्यार्थांचा सत्कार, वाढदिवस शुभेच्छा, आत्ताचे मुख्याध्यापकांचा व सर्व शिक्षकांचा सत्कार, दिवंगत शिक्षक व विद्यार्थांना आदरांजली, संस्थाचालकांचा सत्कार यासह अंकुर व्हॅली या नैसर्गिक पर्यटन स्थळ टुरचं आयोजन इ.कार्यक्रम आयोजीत करण्यात आले. आपल्या जुन्या शाळेतच पुन्हा एकदा बाकावर वर्गात बसुन सर्वांनी विद्यार्थी जीवनाच्या आठवणींना उजाळा दिला.



निंबळक माध्यमिक विद्यालयाच्या स्थापनेनंतरच्या पहिल्या मानांकित इ.१० वी बॅचचा गेट टुगेदर कार्यक्रम उत्साहात झाला.

यावेळी माजी विद्यार्थांपैकी सरपंच जालिंदर कदम, बाळू कोतकर, दादा घोलप, गोरख कोतकर, सुभाष लोढा, कैलास गायकवाड यांनी आपल्या गुरुवर्यांप्रती ऋण व्यक्त करत भाषणे केले. गुरुवर्य बबनराव सातपुते, भाऊसाहेब कोतकर, देवीदस गडाख, भानुदास कोतकर, औटी मॅडम यांनी आपल्या शिष्यांना आता यानंतर नेमकं कसं जगावं ? याचं मार्गदर्शन आपल्या भाषणांतुन केलं. ३७ वर्षानंतर मुलां–मुलींनी एकत्र येत जुन्या काळातील अनेक आठवणींना या गेट टुगेदरमुळे उजाळा मिळाला. अंकुर व्हॅली येथील दुपारनंतरच्या टुरमध्ये सर्व वर्गमित्रांनी आपले पन्नासी पारचं वय विसरुन खूप खूप मनसोक्त नाचण्याचा आनंद लुटला. बोटींग, रोपवे, सायकलींग–रोप वे ने दरी प्रवास, नेमबाजी, गेट टुगेदर मनमोकळा संवाद, वाढदिवस शुभेच्छांनी साजरा, वनभोजन, इत्यादी कार्यक्रमात सर्वांनी भाग घेतला. या दिवशी अगदी सर्वांनी आपलं सरपंच, चेअरमन, प्राथ.माध्य.शिक्षक, डॉक्टर, उद्योजक, व्यवसायीक, प्रगतशील शेतकरी, दुग्धव्यवसायीक यांनी अर्जंट कामे सोडुन व आपलं वय विसरुन आपल्या जुन्या वर्ग मित्रांसाठी खूप आनंद घेतला व बहुमोल वेळ दिला. या गेट टुगेदर मध्ये सर्वांनी आपलं वय विसरुन एक तास मनसोक्त सांघीक केलेला रेन डान्स अगदी तेथील इतर उपस्थित सर्वांचंच लक्ष वेधून गेला. गेट टुगेदरचा हा संपुर्ण दिवस जुन्या मित्रांच्या दिवसभराच्या सहवासाने अविस्मरणीय व आगळा वेगळा ठरला. साऊंड सिस्टीमवर जुन्या गीत गायनाने या गेट टुगेदर कार्यक्रमाचा फिल्मी समारोप झाला.

या प्रसंगी आशाबाई टांगळ, ताराबाई घोडके, बापू टांगळ, भगवान घोलप, नारायण चव्हाण, अनिल गेरंगे, विष्णू गोडसे, रामदास गेरंगे, भाऊसाहेब लामखडे, राजू गेरंगे, विलास म्हस्के, अंबादास जऱ्हाड, दिनकर चोथे, भाऊसाहेब लामखडे, दिगंबर शिंदे, बाळू रोकडे, बाबा कोतकर, भाऊसाहेब कोरडे, जालिंदर गारुडकर, भाऊराव गायकवाड उपस्थित होते.

सूत्रसंचलन दादा घोलप यांनी केले. बाळू कोतकर यांनी आभार मानले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त अभिवादन करताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी पतसंस्थेचे चेअरमन साहेबराव सखाराम कजबे पाटील व व्हा. चेअरमन ज्ञानेश्वर अर्जुन कजबे व शाखाधिकारी सौ. चंद्रकला मधुकर भांड सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# कृष्णा कारंडे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर

नगर – राहुरी तालुक्यातील मानोरी गणपतवाडी येथील रहिवासी असलेले कृष्णा जबाजी कारंडे यांना नुकताच गरुड फाऊंडेशन महाराष्ट्र राज्याचा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर झाल्याचे संस्थेचे कार्याध्यक्ष आयोजक रमेश खेमनर यांनी सांगितले. या पुरस्काराचे वितरण ७ जुन रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. कृष्णा कारंडे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.



### अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई यांच्यावतीने

# नाट्यकर्मी सागर मेहेत्रे यांना मानाचा कार्यकर्ता पुरस्कार जाहीर



नगर – अहिल्यानगरच्या हौशी रंगभूमीवर २५ वर्ष कार्यरत असलेले अभिनेते, दिग्दर्शक आणि राज्य नाट्य स्पर्धेचे समन्वयक सागर मेहेत्रे यांना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई यांचा शाखा मानाचा कार्यकर्ता पुरस्कार जाहीर झाला.

अहिल्यानगरच्या रंगभूमी वर सातत्याने अभिनय, दिग्दर्शन, कधी संयोजक तर कधी बॅक स्टेज जबाबदारी पार पाडत, नाट्य परिषद अहिल्यानगर शाखेच्या अनेक उपक्रमात सक्रीयपणे कार्य करणारा कार्यकर्ता, नगर शाखेच्या स्वागताध्यक्ष करंडक एकांकिका स्पर्धेचे नियोजन त्यांनी अनेक वर्षे केले. नाट्य परिषद मध्यवर्तीच्या अनेक उपक्रमात सागर मेहेत्रे यांचे मोठे योगदान आहे याच कार्याची दखल घेत नाट्य परिषदेने यंदाचा शाखा कार्यकर्ता पुरस्कार जाहीर केला. ही घोषणा परिषदेचे अध्यक्ष तथा अभिनेते प्रशांत दामले यांनी मुंबई कार्यालयात केली. सदर पुरस्कार १४ जून रोजी मुंबई येथे कार्यक्रमात देण्यात येणार आहे.

या पुरस्कार स्वरूपात अहिल्यानगरचा हा बहुमान आहे अशी भावना नाट्य परिषद अहिल्यानगरचे अध्यक्ष अमोल खोले यांनी व्यक्त केली.

सागर मेहेत्रे जिल्ह्यातील सर्व कलाकारांना मदत, सहकार्य, आणि प्रोत्साहन देणारे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे त्यांचा सन्मान म्हणजे जिल्ह्यातील कलाकारांचा प्रातिनिधिक सन्मान आहे असे प्रतिपादन शशिकांत नजन यांनी केले.

परिषदेच्या अहिल्यानगर शाखा आणि उपनगर शाखेन एकमताने सागर मेहेत्रे यांचे नावाची शिफारस मध्यवर्ती परिषदेत केली होती.

या यशाबद्दल मध्यवर्ती, मुंबईचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, नियामक मंडळ सदस्य क्षितिज झावरे, संजयकुमार दळवी, नाट्य परिषद अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष अमोल खोले, माजी अध्यक्ष शशिकांत नजन, प्रसाद बेडेकर, तसेच सर्व नाट्य संस्था प्रमुख, ज्येष्ठ रंगकर्मी यांनी अभिनंदन केले आहे.

# कृष्णाली फाउंडेशन व ग्रामीण विकास व अध्ययन आणि संशोधन संस्थेच्यावतीने जागतिक पर्यावरण दिन साजरा

नगर – जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने कृष्णाली फाउंडेशन आणि ग्रामीण विकास व अध्ययन केंद्र समाजकार्य आणि संशोधन संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या प्रांगणात देशी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत जांभुळ, कांचन, आवळा, चिंच, कृष्णकमळ अशा देशी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली.



कृष्णाली फाउंडेशन आणि ग्रामीण विकास व अध्ययन केंद्र समाजकार्य आणि संशोधन संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या प्रांगणात देशी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी कृष्णाली फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत शेळके पाटील, तसेच ग्रामीण विकास व अध्ययन केंद्राचे अतिथी प्राध्यापक जयेश कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक रणजित राऊत यांनी जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.

रणजित राऊत म्हणाले की, सतत वाढणारे शहरीकरण, जंगलतोड व प्रदूषण यामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येकाने वृक्षारोपण, पाण्याचा जपून वापर व जैवविविधतेचे संवर्धन करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे ही केवळ सरकारचीच नव्हे तर आपणा सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प केला.

संस्थेचे स्वयंसेवक, विद्यार्थी व प्राध्यापकांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवून वृक्षारोपण अभियानात सहभाग नोंदवला.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## प्राण्यांचे दात मजबूत कसे राहतात?

आपण काहीही खाल्ले, तरीही आपल्या दातांचा रंग लगेच वेगळा दिसू लागतो आणि कालांतराने तो पिवळा पडू लागतो. पण, प्राणी दिवसभर काहीही खातात, घाणेरडं पाणी पितात, कधीच दात घासत नाहीत; तरी त्यांचे दात इतके पांढरे, चमकदार आणि मजबूत राहतात. त्यांच्या दातांना कीडही का लागत नाही. नेमकं काय असेल, या मागील कारण जाणून घेऊयात...

आपण जे अन्न खातो. त्याचा थेट परिणाम आपल्या दातांवर होतो. चहा, कॉफी, साखर, सॉफ्ट ड्रिंक्स, प्रोसेस्ड फूड तसेच अनेकांना तंबाखू, धूमपानाचेही व्यसन असते, अशा अनेक गोष्टी दातांचा रंग खराब करतात. विशेष म्हणजे तंबाखूमध्ये असणारे टार आणि निकोटीन दात पिवळे होण्याचे प्रमुख कारण आहेत. याशिवाय आपण खातो ते अन्न शिजवलेलं, मऊ आणि कमी तंतुमय असतं. त्यामुळे चावायला जास्त मेहनत लागत नाही आणि त्यामुळे दातांची नैसर्गिक स्वच्छता होत नाही. उलट अन्नाचे अवशेष दातांमध्ये अडकतात आणि बॅक्टेरिया तयार होतात. प्राण्यांच्या दातांमध्ये कधी पिवळेपणा दिसत नाही, कीड लागत नाही आणि ते सहजपणे पडतही नाहीत. यामागे काही नैसर्गिक कारणं आहेत.

**नैसर्गिक आणि तंतुमय आहार :** प्राणी निसर्गात उपलब्ध असलेलं अन्न खातात. जसं की गवत, पाने, मांस, हाडं, फळं, झाडांची सालं इ. हे सगळं अन्न चावून खावं लागतं. त्यामुळे दातांवर जमा झालेला मळ आपोआप घासून निघतो.





**सलग चावण्यामुळे स्वच्छता :** प्राणी दीर्घकाळ अन्न चावत राहतात. त्यामुळे त्यांचे दात नैसर्गिकरीत्या स्वच्छ राहतात. हे एक नैसर्गिक बशसारखंच काम करतं.

**औषधी गुणधर्म असलेले घटक :** झाडांची साल, काही औषधी वनस्पतींचं सेवन यामुळे त्यांच्या तोंडात बॅक्टेरिया वाढत नाहीत. काही झाडांच्या सालीत जंतुनाशक गुणधर्म असतात. जे दातांना सुरक्षित ठेवतात.

**कोणतेही कृत्रिम रसायन नाही :** प्राण्यांच्या आहारात कोणतीही कृत्रिम गोडी, साखर, रसायने नसतात. त्यामुळे त्यांच्याकडे दातांच्या सडण्याचा किंवा पिवळेपणाचा प्रश्न उद्भवत नाही.

## इजिप्तमध्ये सापडले प्राचीन शहर

इजिप्तमधील पुरातत्त्वशास्त्रज्ञांना सुमारे ३४०० वर्षांपूर्वीचे 'न्यू किंगडम' काळातील एक मोठे प्राचीन शहर सापडले आहे. हे शहर कदाचित प्रसिद्ध फेरो तुतानखामेनचे वडील अखेनाटेन यांनी वसवले असावे आणि नंतर रामसेस दुसऱ्याने त्यामध्ये भर घातली असावी, असा नवा अभ्यास सांगतो.

ही वसाहत कोम एल-नुगुस नावाच्या ठिकाणी सापडली असून, हे ठिकाण इजिप्तच्या अलेक्झांड्रिया शहराच्या पश्चिमेस सुमारे ४३ किलोमीटर अंतरावर आहे. हे ठिकाण भूमध्य समुद्र आणि मारिओट सरोवराच्या मधील खडकाळ पठारावर वसले आहे. यापूर्वी या परिसरात ग्रीक लोकांनी इ.स.पू. ३३२ मध्ये एक नगर व नेक्रोपोलिस वसवले, असे मानले जात होते. मात्र, नव्या संशोधनातून येथे त्याआधीच प्राचीन इजिप्शियन वस्ती होती, हे उघड झाले आहे. संशोधक ग्रीक वस्तीचे अभ्यास करत असताना त्यांना चुकून न्यू किंगडम काळातील (इ.स.पू. १५५० ते १०७०) मातीच्या विटांचे अवशेष सापडले. या शोधामुळे मारिओट सरोवराच्या उत्तरेला सापडलेली ही सर्वात जुनी इजिप्शियन वसाहत ठरते. 'या वसाहतीचा नेमका आकार निश्चित सांगता येणार नाही; पण रस्त्याच्या कडेला नियोजनबद्ध रचना आणि उंच दर्जाचे अवशेष पाहता, हे एक मोठे वसाहती क्षेत्र असावे,' असे अभ्यासाचे प्रमुख लेखक व फ्रेंच नॅशनल सेंटर फॉर सायंटिफिक रिसर्चचे पुरातत्त्वशास्त्रज्ञ सिल्वँन डेन्निन यांनी सांगितले. या वसाहतीत



पावसाचे पाणी निचरा करण्यासाठी रस्त्यांची रचना केली होती. या ठिकाणी रामसेस दुसऱ्याच्या काळातील एक मंदिर, तसेच खासगी अंत्यविधीची स्थाने सापडली असून, त्यावर लष्करी कर्मचाऱ्यांची नावे आहेत. त्यामुळे ही वसाहत लष्करी कारणांसाठी वापरली जात होती, असा अंदाज वर्तवला जात आहे. तसेच, येथे किल्लेबंदी व प्रशासकीय इमारतीही असण्याची शक्यता आहे.

एक विशेष शोध म्हणजे येथे मिळालेल्या एका मडक्याच्या तुकड्यावर मेरिटाटेन नावाचा शिक्कामोर्तब आहे. मेरिटाटेन ही अखेनाटेन व राणी नेफरतिती यांची मुलगी होती. या संशोधनाचे निष्कर्ष 'अँटिक्विटी' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आले.



## अवाढव्य शेती!

आपल्याकडे शेतीच्या बांधावरून होणारी भांडणे ही काही नवी नाहीत. शेतीचे छोटे तुकडे असले, तरी त्यामध्ये घाम गाळणारेही अनेक आहेत. अशा वेळी जगातील सर्वात मोठी शेती हा कुतूहलाचा विषय ठरू शकतो. ४९ वेगवेगळ्या देशांच्या आकारापेक्षा ही शेती मोठी आहे. वाचून तुम्हाला देखील आश्चर्य वाटलं असेल, पण हे सत्य आहे. आता गंमत अशी आहे की, या शेतीत फक्त आणि फक्त ११ लोक काम करतात. तुम्हाला प्रश्न पडला असेल की, इतक्या मोठ्या शेतीत फक्त ११ लोकं कसे काम करू शकतात. तर चला, आज आम्ही तुम्हाला तुमच्या मनातल्या सर्व प्रश्नांची उत्तरे पुढे देत आहोत, चला तर मग जाणून घेऊया...

अनेकदा असे दिसून येते की, लोक मोठ्या कंपन्यांमध्ये शेती करतात. याशिवाय अनेक जण आपल्या अनेक प्रकारच्या कामासाठी फर्मचा वापर करतात. जगात एक शेती आहे जी ४९ देशांपेक्षा मोठी आहे. लोकसंख्या, आकारमान आणि कर्मचारी या दृष्टीनेदेखील मोठी आहे. ही शेती १५,७४६ चौरस किलोमीटरमध्ये पसरलेली आहे. ऑस्ट्रेलियन कॅटल स्टेशन इतके मोठे आहे की ते ४९ वेगवेगळ्या देशांच्या आकारापेक्षा जास्त आहे. अहवालानुसार, हे १५,७४६ चौरस किलोमीटरमध्ये पसरलेले आहे. जी पृथ्वीवरील खासगी मालकीच्या मालमत्तांपैकी एक आहे. हे पाहता, हे शेत नेदरलँड्सपेक्षा उंच, वेल्सइतके रुंद आणि इस्रायलपेक्षा मोठे आहे, असे म्हणता येईल. मात्र, सर्वात मजेशीर बाब म्हणजे अनेक देशांपेक्षा मोठे असूनही या फार्मवर फक्त ११ लोकं काम करतात. हे ॲना क्रीक स्टेशन आहे, जे दक्षिण ऑस्ट्रेलियाच्या मध्यभागी आहे. त्याचा आकार आकर्षक असूनही, अण्णा खाडीतील वातावरण अत्यंत कडक आहे. स्टेशनवर दरवर्षी केवळ २० सेंटिमीटर पाऊस पडतो आणि उन्हाळ्याच्या महिन्यांत तापमान ५५ अंश सेल्सिअस (१३१ डिग्री फॅरेनहाईट) पर्यंत पोहोचते. गवताची वाढ कमी असणे म्हणजे १७,००० जनावरांच्या लोकसंख्येला आधार देण्यासाठी जमीन खूप मोठी असणे आवश्यक आहे.

या कर्मचाऱ्यांमध्ये एक व्यवस्थापक, आठ स्टेशन कर्मचारी, एक प्लांट ऑपरेटर आणि एक स्वयंपाकी यांचा समावेश आहे. एवढ्या कमी कर्मचाऱ्यांमुळे अण्णा क्रीक तंत्रज्ञानावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. गुरांचा शोध घेण्यासाठी रिमोट ऑपरेटेड वॉटर पंप आणि लो फ्लाईंग एअरक्राफ्टचा वापर केला जातो. जनावरे दिसल्यानंतर स्टेशनचे कर्मचारी मोटारसायकलवर स्वार होऊन त्यांना घेरतात. त्याची सध्या चांगलीच चर्चा सुरू आहे.



## सर्वात महागडे औषध

गातील सर्वात महागडं औषध कोणतं, हे माहिती आहे का? कोणत्या आजारावरील उपचारासाठी हे औषध वापरलं जातं? याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

इंग्लंडमधील एक वर्षाच्या बाळ एडवर्डला एका गुंतागुंतीच्या आजाराने ग्रासले आहे, हे कळाल्यानंतर महागड्या औषधाचा प्रश्न ऐरणीवर आला. त्या बाळाला 'एसएमए' नावाचा आजार झाला. म्हणजेच स्पाइनल मस्क्युलर अ‍ॅट्रोफी ने त्याला ग्रासले. स्पाइनल मस्क्युलर अ‍ॅट्रोफीने ग्रस्त असलेल्या त्या मुलावर उपचार करण्यासाठी वापरले जाणारे औषध जगातील सर्वात महागडे औषध असल्याचे म्हटले जाते. त्या औषधाचे नाव झोलजेन्स्मा ड्रग आहे. हेच औषध एका वर्षाच्या बाळ एडवर्डला दिले जातंय. हे औषध म्हणजे प्रत्यक्षात जीन थेरपी आहे. पण, हा आजार काय आहे? याबद्दल जाणून घेऊया.

'एसएमए' आजारात स्नायूंच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या प्रथिनांची कमतरता असते. या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णाची हालचाल थांबते. तो नीट बसू शकत नाही आणि उभाही राहू शकत नाही. अशा रुग्णांच्या उपचारात झोलगेझ्मा औषध हे एक क्रांतिकारी औषध मानले जाते. वैद्यकीय शास्त्राने झोलगेस्माच्या रूपात जीन थेरपीच्या स्वरूपात एक नवीन चमत्कार केला आहे. समोर आलेल्या मीडिया रिपोर्ट्सनुसार या औषधाची किंमत १.७९ दशलक्ष पौंड म्हणजेच सुमारे १८ कोटी रुपये आहे.

## अंटार्क्टिकात उल्कापाताचे विवर

अंटार्क्टिकाच्या पूर्व भागात, बर्फाच्या चादरीखाली लपलेला एक भला मोठा खडकातील खड्डा 'विल्क्स लँड क्रेटर' वैज्ञानिकांच्या कुतूहलाचा विषय ठरला आहे. सुमारे ३१५ मैल (५१० किमी) रुंदीचे हे विवर पृथ्वीच्या गुरुत्वीय क्षेत्रात दिसून आलेल्या खोल 'खोबळी'मुळे शोधले गेले. १९६०च्या दशकापासून या क्रेटरच्या उत्पत्तीविषयी संशोधन सुरू असून, अलीकडील अभ्यासानुसार हा भयंकर उल्कापाताचा परिणाम असू शकतो.



प्राथमिक भूकंपीय आणि गुरुत्वीय अभ्यासांमधून क्रेटरची व्याप्ती सुमारे १५० मैल (२४० कि.मी.) असल्याचे सूचित झाले होते; पण आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आता हे स्पष्ट झाले आहे की, त्याचा आकार यापेक्षा दुप्पट असण्याची शक्यता आहे. २०१८ मधील एका अभ्यासानुसार, विल्क्स लँड क्रेटर अंटार्क्टिकाच्या बर्फाच्या पृष्ठभागाखालून सुमारे १ मैल (१.६ कि.मी.) खाली आहे. या अभ्यासात क्रेटरचे आतापर्यंतचे सर्वात सुस्पष्ट चित्र समोर आले आणि त्याचा संबंध दक्षिण ऑस्ट्रेलियाशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला, जे सुमारे ३५ दशलक्ष वर्षांपूर्वी पूर्व अंटार्क्टिकाशी जोडलेले होते.

या क्रेटरचा नेमका उगम अजूनही स्पष्ट झालेला नसला, तरी संशोधकांचे मत आहे की हा खड्डा खंडांच्या विभाजनाआधीच निर्माण झाला असावा.

२०१५ मधील एका अभ्यासात विविध शक्यता मांडण्यात आल्या : हा क्रेटर ज्वालामुखीजन्य रचना असू शकतो, गाळ साचलेली खाच, खोल झिजलेली दरी किंवा उल्कापातामुळे तयार झालेला खड्डा. उपग्रहाद्वारे दूरसंवेदनाच्या तंत्राचा वापर करून, शास्त्रज्ञांनी या क्रेटरची भौगोलिक वैशिष्ट्ये स्पष्ट केली. पृथ्वीच्या गुरुत्वीय क्षेत्रात या जागी आढळलेल्या नकारात्मक गुरुत्वीय विचलनाच्या केंद्रस्थानी, त्यांनी एक सकारात्मक गुरुत्वीय विचलन आढळून आले. हे केंद्रस्थानी उठून दिसणारे ठिकाण म्हणजे एक 'मॅस्कॉन' असू शकते, असं अभ्यासकांचं म्हणणं आहे. मॅस्कॉन ही अशी रचना आहे, जी मोठ्या उल्कापातानंतर निर्माण होऊ शकते. उल्का जेव्हा पृथ्वीच्या पृष्ठभागाला भेदून आतपर्यंत जाते, तेव्हा ती खालच्या मँटल भागावर परिणाम करते. त्यानंतर मँटल क्षेत्र पुन्हा वर उचकटून एक घन केंद्र तयार करतं, ज्यामुळे त्या भागात गुरुत्वीय शक्ती अधिक दिसून येते.यालाच सकारात्मक गुरुत्वीय विचलन म्हणतात.



## भविष्यात सॅटेलाईट पाठवणे कठीण?

युरोपियन स्पेस एजन्सी (ईएसए) ने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात सांगितले आहे की, पृथ्वीभोवतीच्या अवकाशात कचऱ्याचे प्रमाण इतके वाढत आहे की, भविष्यात काही कक्षा वापरणे अशक्य होऊ शकते. नुकत्याच प्रकाशित झालेल्या या अहवालानुसार, नवीन नियम व मानक अवकाशातील कचऱ्यावर आळा घालण्यासाठी लागू केले जात असले, तरी सध्या कक्षेत असलेला कचरा एकमेकांवर आपटून आणखी धोकादायक ढग निर्माण करू शकतो. या प्रक्रियेला 'केस्लर सिंड्रोम' असे म्हणतात. ईएसएने आपल्या निवेदनात सांगितले, 'जरी आपण पुढे कोणताही नवीन अवकाश कचरा निर्माण केला नाही, तरीही धडकांमुळे सुरू होणाऱ्या साखळी प्रतिक्रियेला थांबवणे शक्य होणार नाही.' सध्या अंदाजे १ सें.मी. पेक्षा मोठ्या आकाराचे सुमारे १२ लाखांहून अधिक कचऱ्याचे तुकडे पृथ्वीभोवती फिरत आहेत. यातील १० सें.मी. पेक्षा मोठ्या सुमारे ५०,००० वस्तू अत्यंत घातक मानल्या जातात. ईएसएच्या म्हणण्यानुसार, एका मटाराएवढ्या (१ सें.मी.) वस्तूची धडकसुद्धा उपग्रह प्रणाली अकार्यक्षम करू शकते, तर त्यापेक्षा मोठ्या वस्तू आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला (आयएसएस) भेदू शकतात. ईएसएने असेही नमूद केले की, २०१६ मध्ये काही मिलिमीटरच्या एका अति सूक्ष्म तुकड्याने 'आयएसएस' च्या खिडकीवर ७ मि.मी.चा ठसठसत चिप मारलेला होता. या समस्येवर बोलताना, अहवालात अवकाश वाहतूक प्रणालीतील बदलांमुळे कचऱ्याचा प्रश्न अधिक गंभीर झाल्याचे सांगण्यात आले आहे. तीन प्रमुख कारणे अधोरेखित करण्यात आली आहेत : प्रक्षेपणांची वाढती संख्या, लहान व बहुपरकीय उपग्रहांच्या तुकड्यांची संख्यात्मक वाढ, व्यापारी अवकाश ऑपरेटरांची वाढ. आजवरच्या इतिहासात इतक्या मोठ्या प्रमाणात प्रक्षेपण झालेले नव्हते. अनेक उपग्रहांचा समूह एकाच वेळी पाठवला जात असल्याने कक्षेत कचऱ्याची शक्यता आणखी वाढली आहे. ईएसएच्या मते, अवकाशाचा शाश्वत वापर सुनिश्चित करण्यासाठी तत्काळ उपाययोजना व आंतरराष्ट्रीय पातळीवरील समन्वय आवश्यक आहे, अन्यथा भविष्यात उपग्रह पाठवणेच दुरापास्त होईल.

## 'एआय'मुळे विचारक्षमतेवर परिणाम

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) वापरणाऱ्या व्यक्तींच्या टीकात्मक विचारक्षमतेवर परिणाम होत असून, त्यामुळे त्या अधिक अविचारी बनत असल्याचा इशारा एका नव्या संशोधनातून देण्यात आला आहे.



मायक्रोसॉफ्ट आणि कार्नेजी मेलॉन विद्यापीठाच्या संयुक्त संशोधनात असे आढळून आले की, जे वापरकर्ते एआयच्या अचूकतेवर जास्त विश्वास ठेवतात, ते त्या साधनांच्या निष्कर्षांचा कमी विचार करतात. हे संशोधन व्यवसाय, शिक्षण, कला, प्रशासन आणि संगणक क्षेत्रातील ३१९ व्यावसायिकांवर आधारित आहे.

संशोधन अहवालात म्हटले आहे, ''तंत्रज्ञानाचा अयोग्य वापर मेंदूच्या क्षमतांमध्ये हळूहळू घट आणतो. यंत्रणांवर अधिक अवलंबून राहिल्यास, वापरकर्त्यांच्या निर्णयक्षमता आणि विचारशक्तीचा सराव होत नाही आणि आवश्यक क्षणी ती कुचकामी ठरू शकते.'' या अभ्यासात सहभागी झालेल्या व्यावसायिकांना (ज्यांना त्यांच्या ज्ञानाच्या आधारे मूल्यनिर्मिती केली जाते) एआय वापराचे तीन उदाहरणे देण्यास सांगितले गेले. यामध्ये चॅट जीपीटीसारख्या जनरेटिव्ह एआय टूल्सचा समावेश होता. त्यानंतर त्यांना विचारले गेले की, त्यांनी या कामात टीकात्मक विचार केला का आणि केल्यास कसा? तसेच, एआयशिवाय हे काम पूर्ण करायला किती मेहनत लागली असती आणि त्यांनी केलेल्या कामावरील विश्वासाबाबतही प्रश्न विचारण्यात आले.

संशोधकांचे म्हणणे आहे की, ''स्वयंचलनाची एक मोठी विडंबनात्मक बाब म्हणजे यंत्रणा नियमित कामे पार पाडतात, आणि अपवादात्मक निर्णय वापरकर्त्यांवर सोपवतात. त्यामुळे वापरकर्त्यांना नियमितपणे निर्णय घेण्याचा सराव होत नाही, आणि अपवादात्मक परिस्थितीत ते तयार नसतात.'' या संशोधनाचे निष्कर्ष या महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या CHI Conference on Human Factors in Computing Systems मध्ये सादर करण्यात येणार आहेत. सध्या हे संशोधन मायक्रोसॉफ्टच्या वेबसाईटवर प्रकाशित करण्यात आले असून, त्यावर अद्याप सहकर्मी पुनरावलोकन ( peer-review) झालेले नाही.

## वाळवंटात अडकलेल्या कुटुंबाचा बचाव

भीषण तापमानासाठी ओळखल्या जाणाऱ्या सौदी अरेबियामधील हलबन वाळवंटात एक सौदी कुटुंब तब्बल आठ दिवसांपर्यंत अडकून पडले होते. वाहन वाळूत अडकल्यामुळे सुरु झालेली ही अडचण भयंकर जीवघेण्या संघर्षात बदलली होती. अन्न-पाण्याशिवाय राहिलेल्या कुटुंबाने गाडीच्या रेडिएटरमधील पाणी पिले आणि खुरट्या झाडांची पाने खाऊन जगण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने त्यांचा वेळीच शोध घेऊन, त्यांचा बचाव करण्यात यश आले.

ही घटना रियाधपासून २३९ कि.मी. अंतरावरील हलबन वाळवंटात घडली. या भीषण परिस्थितीची माहिती मिळाल्यानंतर एनजाद या गैर-सरकारी बचाव संस्थेने रेस्क्यू ऑपरेशन सुरू केले. एनजादला वाळवंटी भागांतील हरवलेल्या लोकांच्या शोधात विशेष कौशल्य आहे. त्यांनी या शोध मोहिमेसाठी ४० बचाव पथकं आणि ड्रोन व डिजिटल मॅपिंग तंत्रज्ञानाचा वापर केला. हे ऑपरेशन २४ तासांहून अधिक काळ चालले. तपासादरम्यान ड्रोनच्या मदतीने वाळवंटातील एका भागात कुटुंबाच्या अस्तित्वाचे संकेत मिळाले. एनजादच्या पथकांनी त्या भागात पिनपॉईंट करून शोधमोहीम तीव्र केली. कुटुंबातील सदस्यांचे शरीर पूर्णतः डीहायड्रेट झालेले होते. मात्र, त्यांच्या बचावासाठीचे प्रयत्न यशस्वी ठरले. सर्व सदस्य सुरक्षितरीत्या बाहेर काढले गेले आणि त्यांना तातडीने वैद्यकीय मदत देण्यात आली.



# महापुरात अडकलेल्या नागरिकांचे जीव वाचविणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांचा शासन स्तरावर सन्मान करा

## खडकी ग्रामस्थांची जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी



सपोनि. प्रल्हाद गिते पोकॉ. नितीन गांगर्डे

नगर – २७ मे २०२५ नगर तालुक्यातील भोरवाडी, अकोळनेर, सोनेवाडी, जाधववाडी, सारोळा कासार, खडकी, वाळकी, शिरढोण या भागात ढग फुटी सदृश्य अती मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे वालूंबा नदीला महापूर आला होता.खडकी येथे एकाच कुटुंबातील पाच लोक महापुरात अडकले होते.नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते आणि पोलीस कॉन्स्टेबल नितीन गांगर्डे यांनी जीवाची पर्वा न करता अतुलनीय साहस दाखवत या लोकांना वाचवले. त्याबद्दल त्यांचा शासन स्तरावर योग्य सन्मान व्हावा, अशी मागणी खडकी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

या पुराने नदीकाठावरील सयाजी कोठुळे यांच्या वस्तीला वालूंबा नदीच्या पाण्याचा वेढा पडल्याने एकाच कुटुंबातील दिपक सयाजी कोठुळे, संतोष सयाजी कोठुळे, ज्योती दिपक कोठुळे, कल्याणी ज्ञानदेव कोठुळे, श्रद्धा संतोष कोठुळे महापुरात अडकले होते. यामधील ज्योती,कल्याणी आणि श्रध्दा या शेतातील ट्रॅक्टरच्या कलंडलेल्या ट्रॉलीच्या एका कोपऱ्यावर आधाराने कशाबशा उभ्या होत्या. तर दीपक आणि संतोष हे एका विजेच्या खांबाच्या आधारावर होते. परिस्थिती अत्यंत भयावह होती. कोणत्या क्षणाला काय घडेल हे सांगणे अवघड झाले होते. अशा बिकट परिस्थिती मध्ये नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते आणि पोलीस कॉन्स्टेबल नितीन गांगर्डे यांनी अतुलनीय धाडस करत वाहत्या पाण्यामधून खडकी येथील पाच लोकांना वाचवले.

खडकी येथील लोकांना सुरक्षित बाहेर काढल्यानंतर पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते आणि त्यांचे कर्मचारी वाळकी आणि पुढे शिरढोण या गावी गेले. तेथील परिस्थीती पण फार बिकट होती. शिरढोण या गावी रात्री साडे आठ वाजता हरिश्चंद्र विठ्ठल वाघमारे, दिपक सोमनाथ खंडागळे, पिंकी दिपक खंडागळे, मनिषा वाघमारे यांना महापुरातून बाहेर काढण्यात आले. नगर तालुका पोलीस ठाण्याच्या इतर कर्मचारी आणि स्थानिक नागरिक यांचीही कामगिरी यावेळी वाखाणण्याजोगीच होती.पण स.पो.नि. गीते आणि पो. कॉ. गांगर्डे यांनी दाखविलेल्या अतुलनीय सहसामुळे ९ जणांचे प्राण वाचले. जीवाची पर्वा न करता कर्तव्य म्हणून अतुलनीय साहस दाखविणाऱ्या या दोन पोलीस अधिकाऱ्यांचा प्रशासकीय पातळीवर यथोचित सन्मान व्हावा अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे खडकी ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याकडे ही मागणी करण्यात आली आहे.

# 'कॅरीबॅगशी नाते तोडा, पर्यावरणाची नाते जोडा

## 'स्नेहबंध'चे प्लास्टिक मुक्ती अभियान

नगर – यंदाच्या पर्यावरण दिवसाची संकल्पना (थीम) 'जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करणे' ही आहे. याला अनुसरूनच स्नेहबंध सोशल फौंडेशनच्यावतीने 'कॅरीबॅगशी नाते तोडा पर्यावरणाशी नाते जोडा' ही संकल्पना घेऊन प्लास्टिक मुक्ती अभियान राबविणार आहे.


'कॅरीबॅगशी नाते तोडा पर्यावरणाची नाते जोडा, अभियानाच्या पोस्टरचे स्नेहबंधचे अध्यक्ष उद्धव शिंदे यांच्यावतीने आ. संग्राम जगताप.

या अभियानाच्या पोस्टरचे आमदार संग्राम जगताप, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, प्लास्टिकमुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे. माणसासह अन्य प्राणी जीवनही धोक्यात आले आहे. प्लास्टिकचे विघटन आणि पुनर्प्रक्रियेबाबत जगभर विविध दावे केले जात असले आणि प्लास्टिकच्या निर्मितीवर बंधने येत असली तरी प्लास्टिकमुक्तीचे आव्हान कायम आहे.

आरोग्यास घातक व पर्यावरणास सर्वात जास्त धोका प्लास्टिकमुळे प्रदुषणही वाढत आहे. राज्य शासनही प्लास्टिक बंदीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवित आहे. त्यामुळे आपण सर्वांनी प्लास्टिक पिशव्या न वापरण्याचा संकल्प करूया असे डॉ. उद्धव शिंदे म्हणाले.

# किरकोळ कारणावरुन केडगावात महिलेस मारहाण

नगर – रोपाच्या कुंड्या उचलून कोठे ठेवल्या असे विचारल्याचा राग येऊन पती पत्नीने ३६ वर्षीय महिलेस शिवीगाळ करीत हाताच्या चापटीने, लाथा बुक्क्यानी, धारदार वस्तूने मारहाण केली. ही घटना केडगाव येथील लिंकरोड वरील, पवार वस्तीतील स्वप्नपुर्ती अपार्टमेंट येथे ५ जून रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास घडली.

या बाबत सोनल प्रदिप दुडगु (वय ३६, रा.स्वप्नपूर्ती अपार्टमेंट, पवार वस्ती, लिंकरोड, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की, राहुल आप्पासाहेब दुर्गे हे फिर्यादीच्या घराचे समोरील प्लॅटमध्ये राहणेस असुन ते विनाकारण फिर्यादीशी वाद घालत असतात. ५ जून रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी राहत असलेल्या स्वप्नपुर्ती अपार्टमेंटच्या ये जा करण्याच्या जिन्याचे बाजुस कुंड्या ठेवलेल्या होत्या.

त्या कुंड्या राहुल दुर्गे व त्याची पत्नी लक्ष्मी दुर्गे यांनी उचलुन कोठेतरी ठेवल्याने त्यांना आमच्या रोपाच्या कुंड्या उचलुन कोठे ठेवल्या असे विचारले असता त्याचा राग येवून लक्ष्मी व तिचा नवरा राहुल हे जिन्यामध्येच फिर्यादी यांना शिवीगाळ करु लागल्याने फिर्यादी त्यांना शिवीगाळ करायला काय झाले? असे विचारले असता लक्ष्मी दुर्गे हीने हाताच्या चापटीने, व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. फिर्यादी यांनी मदतीकरीता इतर शेजाऱ्यांना आवाज दिल्याने लक्ष्मी दुर्गे हीने फिर्यादीचे केस पकडुन मान दाबली व तिने किंवा तिचा नवरा राहुल याने फिर्यादीच्या डाव्या हाताचे दंडावर व मनगटाशेजारी काहीतरी धारदार वस्तु मारुन जखमी केले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादीवरुन पोलिसांनी राहुल दुर्गे, लक्ष्मी दुर्गे यांच्या विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

# पर्यावरण परिषदांचे गावोगाव आयोजन व्हावे : डॉ. प्रियदर्शिनी कर्वे

नगर – जागतिक पातळीवर पर्यावरण विषयक परिषदा होतात. पण त्यामुळे सामान्य माणसांच्या आयुष्यात तातडीने बदल घडत नाही. मात्र, ग्रामीण भागात झालेल्या परिषदेमुळे आपल्या परिसरात बदल हा झपाट्याने होईल. त्यातून पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला गती मिळेल. त्यामुळे अशा पर्यावरण विषयक परिषदांचे गावोगावी आयोजन व्हावे, असे मत जागतिक कीर्तीच्या पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रियदर्शिनी कर्वे यांनी व्यक्त केले.

पर्यावरण दिनानिमित्त आत्मनिर्धार फाऊंडेशन संचलित पर्यावरण संवर्धन समितीच्यावतीने आयोजित इसळक येथे ग्रामीण भागातील पहिल्या पर्यावरण परिषदेच्या उद्घाटन सत्राच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. आत्मनिर्धार फाऊंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी प्रास्ताविकात फाउंडेशनच्या कामकाजाचा आढावा घेत आगामी काळात काय करणार आहोत याचा उपस्थितांसमोर उहापोह केला. आपल्या परिसरातील पर्यावरणप्रेमी कार्यकर्त्यांचे संघटन करून कृती कार्यक्रम हाती घेण्यासाठी आजची परिषद महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.


पर्यावरण दिनानिमित्त आत्मनिर्धार फाऊंडेशन संचलित पर्यावरण संवर्धन समितीच्यावतीने पर्यावरण परिषदेचे आयोजन केले.

यावेळी वॉटरमॅन रमेश खरमाळे, सामाजिक वनीकरणचे विभागीय वन अधिकारी सचिन कंद, प्रा.डॉ. मेहबूब सय्यद, डॉ. नागेश शेळके यांच्यासह पर्यावरणप्रेमी उपस्थित होते. परिषदेचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ प्रबोधनकार हभप भगवान घुगे शास्त्री यांनी भूषविले.

यावेळी बोलताना डॉ. कर्वे म्हणाल्या की, पर्यावरण संवर्धन म्हणजे निव्वळ वृक्ष लागवड नसून गवताच्या पात्यापासून ते झाडांपर्यंत सर्वांचेच संवर्धन म्हणजे खऱ्या अर्थाने पर्यावरण संवर्धन होय. पर्यावरण संवर्धनासाठी डॉ. कर्वे यांनी परिषदे दरम्यान काही उपायोजना सुचवल्या. शालेय स्तरावर हवामान नोंदी ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिल्यास प्रत्येक भागात स्वतःचे असे वेदर स्टेशनस् उभे राहतील.

गावाबाहेरून गावात येणाऱ्या छोट्या वस्तूंची निर्मिती सुरू केल्यास पॅकेजिंगसाठी लागणारे प्लास्टिक कमी होण्यास मदत होईल. कारखान्यामधून येणारं सांडपाणी प्रक्रिया करूनच सोडलं जातय की नाही हे पाहणे, ही लोकांची जबाबदारी आहे.

लोकप्रतिनिधी हे जनतेचे नेते नसून जनतेचे अनुयायी आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधींवर पर्यावरणप्रेमींचा दबावगट निर्माण करण्याचे काम या परिषदांमधून होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

वॉटरमॅन रमेश खरमाळे यांनी प्लास्टिकचे दुष्परिणाम विविध उदाहरणांच्या माध्यमातून विशद केले. कार्बन डायऑक्साइडचे वातावरणातील प्रमाण वाढत असून पर्यावरण संवर्धनासाठी तातडीनं उपाययोजना कराव्या लागणार असल्याबाबत गांभीर्यपूर्वक मांडणी केली. अन्यथा मानव जातीच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणार असल्याचा इशारा दिला. पावसाळ्याच्या पूर्वीच जमिनीत काही क्षेत्रात चर खोदून पाणी जमिनीत जिरवल्यास भूजल पातळी वाढून पठार भागावर नंदनवन फुलेल, असेही ते म्हणाले. विभागीय वनाधिकारी सचिन कंद यांचेही यावेळी भाषण झाले. या परिषदेला पर्यावरणप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आपल्या परिसरातील पर्यावरणपूरक कार्यक्रम हाती घेण्यासाठी कार्यकर्त्यांचे चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्रात संदीप महाराज कळसे, अमित गायकवाड, रामदास कोतकर, सागर दाणी, बलभीम निमसे, संतोष घोलप, सतीश गेरंगे, राज ठोंबरे, संजय म्हस्के, प्रिया कोठारी, संदीप जाधव यांनी सहभाग नोंदवला. यावेळी पर्यावरणप्रेमींनी विविध सूचना मांडल्या. या सूचनांची नोंद घेऊन आगामी काळात चिंतन बैठकीचे आयोजन करून कृतिकार्यक्रमाची घोषणा केली जाईल, अशी माहिती समन्वयक ड. राहुल ठाणगे यांनी दिली.

परिषदेचे सूत्रसंवादक म्हणून सुनिल जाजगे, दादासाहेब घोलप यांनी काम पाहिले. पर्यावरण संवर्धन समितीचे अध्यक्ष भानुदास कोतकर यांनी आभार मानले.

यावेळी त्रिदल संघटनेचे एकनाथ आडसुरे, लेखक सचिन मोहन चोभे, ह.भ.प. सिद्धनाथ मेटे, संगिता जाजगे, संध्या मेढे, सतीश सातपुते, अंकुश शेळके, बाळासाहेब खपके, उद्योजक अजय लामखडे, डॉ.दिलीप पवार, संजय गेरंगे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप गेरंगे, संभाजी सोनवणे, मच्छिंद्र म्हस्के, ज्ञानेश्वर डहाळे, रविंद्र पवार यांनी मेहनत घेतली.

# लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी शिक्षिका संजना चेमटे यांनी मिळविल्या विविध सुविधा

नगर – जिल्ह्यातील नगर तालुक्यातील यशवंतनगर येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेचे लोकसहभाग मधून उपक्रमशील शिक्षिका संजना भगवंत चेमटे यांनी सहकारी शिक्षक, पालक, ग्रामस्थ यांच्या सहकार्याने शाळेचा कायापालट करून विद्यार्थ्यांसाठी विविध भौतिक सुविधा मिळविल्या आहेत.त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले आहे. संजना चेमटे या जून २०१९ मध्ये या शाळेत बदलीने हजर झाल्या तेव्हा त्यांनी शाळेतील सर्व बाबींची पाहणी करून सहकारी शिक्षक, पालक, ग्रामस्थ यांचेशी चर्चा करून शाळेत विद्यार्थ्यांसाठी लोकसहभागातून शाळेचे योग्य परिवर्तन करण्याचा संकल्प केला. शाळेत लोकसभागातून विद्यार्थ्यांसाठी आनंददायी पूरक वातावरण आणि विविध भौतिक सुविधा मिळविण्याबाबत त्यांनी अनेकांशी चर्चा करून पाठपुरावा केला. यासाठी त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. शाळेत विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची मूलभूत सुविधा कायमस्वरूपी निर्माण करण्यासाठी लोकसहभागातून पिण्याच्या पाण्याची मोठी टाकी, बोरवेल घेऊन त्यावर मोटार पंप बसवून, प्लंबिंग करून शाळेत पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सुविधा निर्माण केली. शाळेत मुला मुलींच्या स्वच्छतागृहाची दुरावस्था झाली होती. याबाबत त्यांनी पाठपुरावा करून शाळेत मुलांसाठी आणि मुलींसाठी स्वतंत्रपणे उत्कृष्ट प्रकारचे स्वच्छतागृह आणि शौचालय बांधकाम करून घेतले.


शिक्षिका संजना चेमटे यांनी लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी मिळविल्या विविध सुविधा मिळविल्या.

विद्यार्थी स्वच्छतागृह व शौचालय यांचा वापर करतात. लोकसभागातून शाळा इमारतीची भिंत, दरवाजे, खिडक्या, मैदान अशा काही बाबींची दुरुस्ती करून घेतली. शाळेत एकूण चार वर्ग असून तीन शिक्षक कार्यरत आहेत. शाळेत मात्र दोनच वर्गखोल्या आहेत. विद्यार्थ्यांना बसण्यास पुरेशा वर्गखोल्या नव्हत्या. त्यामुळे शिक्षिका संजना चेमटे यांनी अनेकांशी चर्चा करून पाठपुरावा करून विद्यार्थ्यांना तात्पुरते बसण्याची व्यवस्था व्हावी म्हणून लोकसहभागातून पत्र्याचे शेड तयार करून घेतले. शाळेत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पूरक व आनंददायी वातावरण निर्माण होण्यासाठी त्यांनी लोकसहभागातून आकर्षक शाळा रंगकाम करून घेतले त्यावर सुंदर पेंटिंग केली. शाळा इमारत व परिसर आकर्षक दिसू लागला. जुन्या शाळेचे स्वरूप बदलून नवीन सुंदर शाळा निर्माण झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेचे आकर्षण वाटू लागले. त्यांना शाळा सुटली तरी घरी जाऊ वाटत नाही.लोकसभागातून त्यांनी शाळा डिजिटल व ई लर्निंग केली. शाळेच्या भिंतीवर विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असे शैक्षणिक बाबींचे लेखन करून घेतले. तसेच शाळेत वर्गातील भिंतीवर विविध शैक्षणिक बाबींचे डिजिटल फ्लेक्स व तक्ते तयार करून लावले.त्याचा विद्यार्थी वापर करतात.सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे.विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे शिक्षण देण्यासाठी लोकसहभागातून संगणक, एलईडी, इंटरॲक्टिव्ह बोर्ड, लाऊड स्पीकर घेऊन त्यावर विद्यार्थ्यांना प्रभावीपणे अध्ययन–अध्यापन केले जाते.

लोकसहभागातून ग्रंथालयास पुस्तके मिळाली. संजना चेमटे या शाळेत आठवड्यातून एकदा विविध प्रकारच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरून विद्यार्थ्यांना विविध प्रकारची त्यांच्या आवडीची पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध करून देतात तसेच घरीही विद्यार्थ्यांना वाचनासाठी अनेक पुस्तके देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती रुजली आहे. तसेच उन्हाळ्याच्या सुट्टीतही त्या निरंतर वाचन उपक्रम राबवितात उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांचे व गट करून आठवड्यातून एकदा विद्यार्थ्यांच्या घरी विविध पुस्तकांचे प्रदर्शन भरून त्यांना अवांतर वाचनाची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून देतात. हा उपक्रम कायमस्वरूपी राबविला जातो. या उपक्रमाचे महत्त्व पालकांना ग्रामस्थांना व इतरांना पटल्यामुळे त्यांनी लोकसहभागातून शाळेच्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी विविध प्रकारची पुस्तके दिली. समाजातील इतर घटकांनीही लोकसहभागातून शाळेच्या ग्रंथालयास विद्यार्थ्यांना वाचनासाठी अवांतर वाचनासाठी अनेक पुस्तके दिली. लोकसभागातून शाळेला विविध प्रकारच्या खेळांचे साहित्य मिळविले आहे. त्यामुळे विद्यार्थी विविध प्रकारचे खेळ आनंदाने खेळतात. विद्यार्थ्यांना खेळातून शिक्षण मिळते. विविध क्रीडा स्पर्धेत विद्यार्थी आनंदाने सहभागी होतात.लोकसहभागातून विविध राष्ट्रीय नेत्यांचे फोटो घेतले. लोकसहभागातून शाळेच्या मैदानात मुरूम टाकण्यात आला.लोकसहभागातून विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, शिष्यवृत्ती सराव परीक्षा संच झेरॉक्स, गणवेश, ट्रॉफी असे अनेक साहित्य मिळविले.

लोकसहभागातून विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापनासाठी विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य निर्मिती करून कृतिशील आनंददायी शिक्षण दिले जाते. लोकसहभागातून शाळेचा कायापालट करताना त्यांना सहकारी शिक्षक, पालक, ग्रामस्थ, अधिकारी यांचे सहकार्य मिळाले.

# शिक्षकांना कॅशलेस मेडिक्लेम योजना लागू करा

नगर – महाराष्ट्रातील तमाम शिक्षक शिक्षकेतरांना कॅशलेस मेडिक्लेम योजना लागू करावी यासंदर्भात स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्यमंत्री, शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निवेदन दिले.


प्रसाद शिंदे

निवेदनात म्हटले आहे की सरकार नेहमीच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हिताचा विचार करत आहे पण शिक्षक शिक्षकेतर वर्गासाठी अत्यंत आवश्यक अशी कॅशलेस मेडिक्लेम योजना शिक्षकांना ही योजना लागू झाल्यावर शिक्षक बंधू भगिनींना खुप मोठा आधार मिळणार आहे. जर एखादा शिक्षक आजारी पडला तर या योजनेमुळे त्याच्या कुटुंबाला खुप मोठा आधार मिळेल बऱ्याच वेळा शिक्षकांकडे उपचारासाठी पैसे नसतात पैसे उभे करण्यात कुटूंबातील व्यक्तीना खूप त्रास सहन करावा लागतो. शासनाच्या नियमानुसार उपचार पूर्ण झाल्यावर फाईल जमा करू खर्च दिला जातो पण ही प्रक्रिया खूप वेळ खाऊ आहे यामध्ये बदल होणे अपेक्षित आहे आपणास राज्यातील तमाम शिक्षकांच्या वतीने विनंती करतो आहोत की आपण येणाऱ्या कॅबिनेटच्या बैठकीमध्ये सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करावे आणि शिक्षकांना कॅशलेस मेडिक्लेम योजनेचा लाभ मिळवून देण्याचा शासन निर्णय निर्गमित करावा अशी मागणी जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी केली.

याप्रसंगी उमेश भोईटे, अमोल क्षीरसागर सर्व तालुका अध्यक्ष जिल्हा कार्यकारणी सदस्य महिला आघाडी प्रमुख येणाऱ्या काळात योजना लागू होण्यासाठी मेहनत घेणार आहे.

# नागरदेवळे येथे जागतिक दृष्टिदान दिनानिमित्त १० जूनला मोफत नेत्रतपासणी शस्त्रक्रिया शिबीर

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशन यांचेवतीने जागतिक दृष्टिदान दिनानिमित्त १० जून रोजी मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू, काचबिंदू, तिरळेपणा शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर येथे सकाळी ९ ते ३ या वेळेत आयोजित केलेले आहे. गरजू रुग्णांनी या मोफत शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी केले आहे.

शिबीरात सर्व रुग्णांची मोफत नेत्रतपासणी करण्यात येऊन ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज भासेल अशा रुग्णांवर पुणे येथील बुधराणी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात येईल. रुग्णांची राहणे, जेवणाची मोफत व्यवस्था करण्याची आलेली आहे.

रुग्णांनी नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी जालिंदर बोरुडे मो.नं. ९८८१८१०३३३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# आदिशक्ती अभियान राबविण्यासाठी ग्रामपंचायतींनी ग्रामसभेचे आयोजन करावे

नगर – राज्यात सन २०२५–२६ वर्षामध्ये आदिशक्ती अभियान राबविण्यात येणार असून या माध्यमातून ग्रामस्तरीय समित्यांना आदिशक्ती पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. जिल्ह्यात हे अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामसभांचे आयोजन करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले आहे.

ग्राम चळवळीतून महिलांच्या समस्यांचे महत्त्व जाणून घेणे व महिलांच्या आरोग्य समस्यांचे संवेदनपणे निवारण करणे, कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू प्रमाण कमी करण्यासाठी सक्षम समाजनिर्मिती, लिंगभेदात्मक विचार सरणीला आव्हान देऊन किशोरवयीन मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढवून बालविवाहमुक्त समाजाचे निर्माण, लैंगिक, शारिरीक अत्याचाराला प्रतिबंध करुन हिंसाचारमुक्त कुटूंब व समाज निर्माण करुन अनिष्ट रूढींचे निर्मूलन करणे, महिला नेतृत्वाला सक्षम करत पंचायत राज पद्धतीचे महिलांचा सहभाग वाढविणे, महिला, किशोरी यांना शिक्षण, रोजगार निर्णय व हक्क यामध्ये समान संधी निर्माण करुन शासकीय योजनांचा लाभ व स्वयंरोजगाराच्या संधीच्या माध्यमातून आर्थिक उन्नत स्त्री संकल्पना राबविण्याच्या उद्देशाने आदिशक्ती अभियान राबविण्यात येत आहे. ग्रामसभेमध्ये महिला बचतगटातील सदस्य व महिला ग्रामसंघाच्या पदाधिकाऱ्यांनी या हिरिरीने सहभाग नोंदवावा, असे आवाहनही श्री. भंडारी यांनी केले आहे.

# न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू : प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे



नगर – न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर येथे AICTE (अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद) मान्यताप्राप्त BCA (बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स) आणि BBA (बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन) या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा अनिवार्य आहे. कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थी या पदवी अभ्यासक्रमांसाठी पात्र आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या सीईटी (कॉमन एन्ट्रन्स टेस्ट) सेलद्वारे नुकतीच या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षा घेण्यात आली होती आणि या परीक्षेचा निकाल ४ मे रोजी जाहीर झाला आहे.

BCA/BBA प्रवेश परीक्षा दिलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश परीक्षेच्या निकालासह महाविद्यालयाच्या संबंधित विभागात संपर्क साधावा आणि प्रवेश प्रक्रियेची माहिती समजून घेण्यासाठी भेट द्यावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. सागडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित विभागाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.



# शहरात ७ जून रोजी ईदगाह मैदानावर सकाळी ९:३० वाजता सामुदायिक नमाज

नगर – शहरात शनिवारी (दि. ७ जून) ईद उल अज्हा (बकरी ईद) मुस्लिम बांधवांच्या वतीने साजरा होणार आहे. सकाळी ९:३० वाजता ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज अदा केली जाणार आहे. सर्व मुस्लिम बांधवांनी वेळेत पोहचून ईदची नमाज अदा करण्याचे आवाहन अहमदनगर यतीमखाना हिलाल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

